**ANNUAL GENERAL MEETING**

**Day & Date**: Thursday, 24th September, 2026

**Time**: 11:00 A.M. (IST) (Meeting started at 11:00 A.M. IST)

**Mode and Deemed Venue:** Through Video Conferencing (Zoom Meeting), At Post Pimpali, Tal. Baramati, Dist. Pune – 413102

**Corporate Participants:**

1) Mr. Rajendra D. Pawar: Chairman and Managing Director
2) Mr. Subhash J. Gulave: Whole-Time Director
3) Mrs. Sushama S. Mane: Independent Director
4) Mr. Subhash M. Kore: Whole-Time Director
5) Mr. Devendra Kumar Gupta: Chief Financial Officer
6) Mr. Devendra V. Kulkarni: Company Secretary

**Secretarial Auditor:**

1. CS Mahesh Risbud

**Scrutinizer:**

1) CS Hrishikesh Wagh – Partner, KANJ and Co. LLP

- **Welcome Address – Mr. Devendra Kulkarni:**

नमस्कार, मी देवेंद्र कुलकर्णी, आपल्या, बारामती ॲग्रो संस्थेचा कंपनी सेक्रेटरी, या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे, संस्थेच्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी जमलेल्या सभासदांचे स्वागत करतो, आणि आपल्या संस्थेच्या, माननीय चेअरमन साहेबांचे, executive vice chairman रोहित दादा यांचे व संस्थेच्या संचालक मंडळाचे सदस्य सुभाष गुळवे सर, सुभाष कोरे सर, ऋषिकेश दाभाडे सर, सुषमा माने मॅडम, वृषाली बांदल मॅडम, आणि CFO, देवेंद्र गुप्ता सर यांचेही स्वागत करतो.

तसेच संस्थेचे सल्लागार, बाबासाहेब सूर्यवंशी सर, आर्थिक सल्लागार, रोहित मेहेंदळे सर, संस्थेचे स्टॅटयूटरी ऑडिटर, कीर्तने पंडित, चार्टर्ड अकाउंटंट्स यांचे पार्टनर, पराग पानसरे सर,

सेक्रेटरिअल ऑडिटर, महेश रिसबूड सर आणि या मीटिंग साठी चे स्क्रूटीनाईझर ह्रिषीकेश वाघ सर यांचे ही स्वागत करतो.

ही सभा, कंपनी कायद्याच्या आवश्यक त्या तरतुदींचे पालन करून विडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेत आहोत. स्टॅटयूटरी रजिस्टर्स पिंपळी येथील कार्यालयात इन्स्पेक्शन साठी ठेवण्यात आले आहेत.

सभेसाठी आवश्यक असणारी सभासदांची संख्या, म्हणजेच कोरम हा उपस्थित आहे. सभेच्या प्रथे प्रमाणे, सभेच्या नोटिसचे वाचन आपल्यासमोर करत आहे.

**नोटीस**

सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, बारामती ॲग्रो लिमिटेड संस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दिनांक २४ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, झूम मीटिंग **(“व्हिडिओ कॉन्फरन्सिंग”)** माध्यमातून खालील विषय हाताळण्यासाठी घेण्यात येणार आहे.

**सर्वसाधारण विषय**

**१)** संस्थेचे दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजीचे स्वतंत्र वित्तीय विवरणपत्र तसेच संचालकांचा व हिशेब तपासनिसांचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे.

**२)** संस्थेचे दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजीचे एकत्रित वित्तीय विवरणपत्र तसेच संचालकांचा व हिशेब तपासनिसांचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे.

**३)** ६% प्रेफरेन्स शेअर्स वर लाभांश (डिविडेंड) घोषित करणे.

**४)** ९% प्रेफरेन्स शेअर्स वर लाभांश (डिविडेंड) घोषित करणे.

**५)** क्रमपद्धतीने निवृत्त होणाऱ्या व पुनःनेमणुकीसाठी संमती दर्शविलेल्या श्री. ऋषिकेश नामदेव दाभाडे यांची संचालकपदी नेमणूक करणे.

**विशेष विषय**

**६)** किंमत लेखपरीक्षकांचा ३१ मार्च, २०२७ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाकरिता मानधन ठरविणे.

७) सौ. वृषाली र. बांदल (डीआयएन: ११०२७१८८) यांची स्वतंत्र संचालक म्हणून नेमणूक करणे.

८) श्री. सुभाष म. कोरे (डीआयएन: ०३६२६०४३) यांच्या नियुक्तीच्या अटींमध्ये बदल करणे.

९) श्री. सुभाष म. कोरे (डीआयएन: ०३६२६०४३) यांच्या वेतनामध्ये बदल करणे.

१०) श्री. राजेंद्र दि. पवार (डीआयएन: ००२२६८४८) यांची अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी पुनःनेमणूक करणे आणि वेतन ठरविणे.

११) श्री. रोहित रा. पवार (डीआयएन: ००५९०६७९) यांची पूर्णवेळ संचालकपदी पुनःनेमणूक करणे आणि वेतन ठरविणे.

१२) श्री. रोहित रा. पवार यांचा आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता कमिशन ठरविणे.

आता, माननीय सुभाष गुळवे सर, यांना विनंती करतो की त्यांनी संस्थेचा आर्थिक वर्ष २०२५-२६ चा आढावा सभेसमोर मांडावा.

- **Financial Overview - Mr. Subhash J. Gulave:**

नमस्कार, मी आपल्या संस्थेचा आर्थिक वर्ष २०२५-२६ चा आर्थिक आढावा आपल्यासमोर मांडत आहे:

१) **भागभांडवल:** ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे भागभांडवल रु. ४० कोटी ४२ लाख आहे. अहवाल वर्षामध्ये भागभांडवलामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

२) **एकूण मालमत्ता:** ३१ मार्च २०२६ अखेर, संस्थेची स्थावर मालमत्ता रु. १,१३९ कोटी ९२ लाख आहे. मागील वर्षीची संस्थेची स्थावर मालमत्ता रु. १,१३५ कोटी ४० लाख होती.

३) **उलाढाल:** ३१ मार्च २०२६ अखेर, संस्थेची एकूण उलाढाल रु. ६,१४३ कोटी २१ लाख आहे. तर मागील वर्षीची उलाढाल रु. ५,४६३ कोटी ०८ लाख होती.

४) **घसारा:** अहवाल वर्षामध्ये, घसारा रु. १६४ कोटी ९३ लाख असून मागील वर्षी रु. १५४ कोटी ०३ लाख होता.

५) अहवाल वर्षामध्ये एकूण रु. २१ लाख ४८ हजारांची रोपे देण्यात आली. तसेच २१ लाख १४ हजार रुपयांचे ड्रीप बसवण्यात आले तसेच एकूण रु. २ कोटी १७ लाखांची खते वाटप करण्यात आली.

६) करारपद्धतीने कुक्कुटपालन या योजनेनुसार, आपले संस्थेने ९,००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. या शेतकऱ्यांना या वर्षामध्ये जोपासना खर्च (growing charges) म्हणून एकूण रु. २६१ कोटी ३७ लाख देण्यात आले आहेत.

यानंतर मा. चेअरमन, श्री. राजेंद्र दादा पवार साहेबांना विनंती करतो की, त्यांनी सभेला संबोधित करावे.

- **Chairman's Speech - Mr. Rajendra D. Pawar:**

नमस्कार, आपल्या संस्थेच्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून उपस्थित असलेले सर्व सभासद, संचालक मंडळातील माझे सहकारी सदस्य, संस्थेचे सर्व ऑडिटर्स तसेच इतर पदाधिकारी आणि सहकारी यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

या सभेसंदर्भात, कंपनी सचिवांनी सांगितल्या प्रमाणे, कंपनी कायद्याच्या तरतुदींचे पालन करून, मागील वर्षी प्रमाणे, या वर्षी सुद्धा, संस्थेची, वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर आपल्या संस्थेची उलाढाल ६,००० कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. ही निश्चितच आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. हा टप्पा केवळ संस्थेच्या प्रयत्नांमुळे नाही, तर संस्थेशी जोडलेल्या आपल्या सर्व सभासद, शेतकरी, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे आणि योगदानामुळे आपण गाठू शकलो आहोत. त्यासाठी मी आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

साखर हंगाम २०२५-२६ मध्ये, अपेक्षेपेक्षा कमी ऊस उत्पादन, वाढलेला H&T खर्च आणि मर्यादित निर्यात संधी अशा आव्हानात्मक परिस्थितीत सुद्धा संस्थेच्या चारही साखर कारखान्यांनी एकत्रितपणे ३० लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले होते. ह्यामध्ये आपल्या ऊस उत्पादक शेतकरी सभासदांचे मोठे योगदान आहे. त्यासाठी आपल्या सर्व ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

२०२६-२७ चा ऊस हंगाम हा लवकरच सुरू होणार आहे. पुढील हंगामाचा कालावधी किती असेल, याबाबत सध्या निश्चित अंदाज बांधता येत नाही. त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या उसापैकी जास्तीत जास्त

ऊस आपल्या कारखान्यांना गाळपासाठी उपलब्ध करून घेण्यासाठी संस्थेचा ॲग्री विभाग सातत्याने प्रयत्नशील असणार आहे. तसेच या प्रयत्नांना आपल्या ऊस उत्पादक शेतकरी सभासदांचे सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे.

संस्थेच्या, व्यवसाय वृद्धी व विस्ताराच्या दृष्टीने, आपल्या संस्थेने, पश्चिम बंगाल, आसाम, ओरिसा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये सुरु केलेला पोल्ट्री व्यवसाय, तसेच उत्तर प्रदेश, बिहार आणि राजस्थान या राज्यांमधील फीड व्यवसाय स्थिरावत आहे.

परंतु मागील काही काळापासून, या व्यवसायांसमोरही काही आव्हाने आहेत. विशेषतः मका आणि सोयाबीन यांसारख्या प्रमुख कच्च्या मालाच्या किमतींमध्ये गेल्या काही काळात मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत आहेत. त्याचा थेट परिणाम फीड आणि पोल्ट्री व्यवसायांवर होत आहे. अशा परिस्थितीतही, हे व्यवसाय अधिक सक्षम कसा होईल, यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करत आहोत.

मी नेहमीच आपल्या शेतकरी बांधवांशी संस्थेच्या सभेच्या माध्यमातून, विविध उपक्रमांमधून, तसेच प्रत्यक्ष भेटीगाठींद्वारे संवाद साधत असतो. या संवादातून मी सातत्याने एका महत्त्वाच्या विषयाकडे आपले लक्ष वेधत आलो आहे आणि तो विषय म्हणजे बदलते हवामान आणि त्याचा शेतीवर होणारा परिणाम.

या वर्षी, आपण सर्वांनी अनुभवले आहे की 'एल निनो' मुळे जुलै महिन्या मध्ये अतिवृष्टी झाली परंतु ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, एल निनो चा प्रभाव पुढील वर्षी फेब्रुवारी पर्यंत राहणार आहे.

इथून पुढे कायमच अशा नैसर्गिक आपतींना, आपल्या सर्वांना तोंड द्यावे लागणार आहे त्याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावर, उत्पादन खर्चावर आणि पर्यायाने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे. म्हणूनच, भविष्यात अशा नैसर्गिक आपत्ती आणि हवामानातील बदलांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला आतापासूनच योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

पाण्याचे योग्य व्यवस्थापन, ड्रीपचा जास्तीत जास्त वापर, योग्य पिकांची निवड आणि योग्य पद्धतीने पीक लागवड तसेच अधिकाधिक AI तंत्रज्ञनाची मदत याकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे.

या दृष्टीने संस्थेच्या माध्यमातून, व्ही.एस.आय च्या आणि इतर उपक्रमांद्वारे काही शेतकरी बांधवांना Weather Stations तसेच Soil Moisture Sensors उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीसाठी हवामान अंदाज आणि जमिनीतील ओलावा याची माहिती वेळेवर मिळू शकते आणि त्याच्या आधारे अधिक शास्त्रीय पद्धतीने पीक नियोजन करता येऊ शकते.

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक सक्षम, उत्पादक आणि हवामानातील बदलांना तोंड देणारी कशी करता येईल, यासाठी संस्था आपल्या शेतकरी बांधवांच्या सदैव सोबत आहे.

आपल्या संस्थेचा विस्तार  आणि प्रगती हि व्यवसायातील अडचणी आणि चढउतार असताना देखील, आपल्या सर्वांच्या सहकार्याने होतच राहणार आहे, त्यासाठी आपण सर्वजण, आपली भूमिका व जबाबदारी नुसार आपले योगदान देणार आहात याचा मला विश्वास आहे आणि आपले सहकार्य, विश्वास कायम असावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी..!!!

धन्यवाद...!!!

- **Voting Instructions - Mr. Devendra Kulkarni:**

चेअरमन साहेबांनी सभेला संबोधित केल्याबद्दल, सर्वांतर्फे, मी त्यांचे आभार मानतो.

ज्यांनी ई-मतदान मार्फत मतदान केलेले नाही, त्यांनी एन.एस.डी.एल च्या संकेत स्थळावर वर जाऊन आपले मतदान नोंदवावे. ई-मतदान ची लिंक चॅट बॉक्स मध्ये दिलेली आहे. ई-मतदान विषयी अधिक माहिती हवी असल्यास, सभा संपल्यानंतर कृपया कंपनीच्या शेअर्स डिपार्टमेंट मध्ये संपर्क साधावा.

सभासदांना काही प्रश्न असल्यास त्यांनी ते विचारावे, किंवा मीटिंग नंतर कंपनीच्या शेअर्स डिपार्टमेंट मध्ये संपर्क साधावा.

आजच्या सभे करिता आपण सर्वजण या विडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित राहिलात, त्याबद्दल मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि आजची सभा संपल्याचे जाहीर करतो.

धन्यवाद...!!!

---

**Meeting concluded at: 11:10 A.M. IST**